## स्पर्धेची माहिती व नियमावली

१) महाराष्ट्रातील कोणत्याही ज्युनिअर किंवा सिनीअर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या स्पर्धेत भाग घेता येईल. प्रत्येक महाविद्यालयास वक्तृत्व स्पर्धसाठी जास्तीत जास्त दोन स्पर्धकांना सहभाग घेता येईल.
२) स्पर्धेचे प्रवेश शुल्क स्पर्धकास रुपये १००/- राहील.
३) स्पर्धकांची निवास व भोजनाची व्यवस्था केली जाईल.
मुक्कामी येणाऱ्या स्पर्धकांनी पूर्व कल्पना द्यावी.
४) सर्व भाषणे मराठीतून होतील.
५) प्रत्येक स्पर्धकास स्पर्धेसाठी ७ मिनिटे ( ५+२) वेळ दिला जाईल.
६) स्पर्धा शुक्रवार दि.१९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक ९.३० वाजता सुरु होईल.
७) स्पर्धकांच्या भाषणाची क्रमवारी स्पर्धा सुरु होण्यापूर्वी जाहीर केली जाईल.
८) प्रत्येक स्पर्धकाजवळ सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचे ओळखपत्र व प्राचार्यांचे सहमतीपत्र सोबत आणावे.
९) स्पर्धकांनी सोबतचा क्यू आर. कोड स्कॅन करुन दि.१३/९/२०२५ पर्यंत ऑनलाईन नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.
१०) परिक्षक मंडळाचा निर्णय अंतिम व तो स्पर्धकांना बंधनकारक राहील.
११) वरील सर्व नियमांमध्ये ऐनवेळी बदल करण्याचे अधिकार मा.प्राचार्यांनी राखून ठेवले आहे.

## पारितोषिके

| प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक | उत्तेजनार्थ |
|---|---|---|---|
| ₹ 10001 | ₹ 7001 | ₹ 5001 | ₹ 2001 |

सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

वक्तृत्व स्पर्धा २०२५ नांव नोंदणी करिता QR Code स्कॅन करा.



Whatsapp Group Join करण्याकरिता येथे स्कॅन करा.

anand funsage @ 9730150905

रयत शिक्षण संस्थेचे,

# चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स
# श्रीरामपूर,जि.अहिल्यानगर

नॅक अ मानांकन प्राप्त ( सी.जी.पी.ए-३.१४)



## पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील
## ६३ वी राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन
# वक्तृत्व स्पर्धा २०२५

शुक्रवार दि.१९ सप्टेंबर २०२५



प्रति,
मा.प्राचार्य यांना
स.न.वि.वि.
महोदय,

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील उर्फ ती.आण्णा यांचे जयंती निमित्ताने आमच्या महाविद्यालयात **शुक्रवार दि.१९/०९/२०२५** रोजी "**पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा** " आयोजित करण्यात आलेली आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने महाविद्यालयीन युवक-युवतींमध्ये वक्तृत्व कलेचे संवर्धन होऊन व्यक्तिमत्व विकासाला संधी मिळते. कर्मवीराचंचे विचार, कार्य,त्याग, समर्पण व दीन दुबळ्यांच्या शिक्षणाविषयीची तळमळ यांचे स्मरण केले जाते. वैचारिक मंथनातून कर्मवीरांच्या कार्याचा आदर्श घेऊन नवीन शैक्षणिक उपक्रम सुरु केले जातात.

कृपया आपल्या महाविद्यालयातील सूचना फलकावर वक्तृत्व स्पर्धेचे निमंत्रण प्रसिध्द करुन स्पर्धक पाठविणे विषयी सविनय विनंती आहे.

## आपले नम्र


**डॉ.सौ.गुजर पी.एस.**
समन्वयक, वक्तृत्व स्पर्धा
Mob.9326635858

**डॉ.संजय कांबळे**
प्राचार्य
सी.डी.जैन कॉलेज ऑफ
कॉमर्स,श्रीरामपूर

E mail : karmaveersaptah@gmail.com


## वक्तृत्वाचे विषय

१ कर्मवीर भाऊराव पाटील एक द्रष्टा ज्ञानयोगी
२ त्यागमूर्ती रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील (वहिनी)
३ माझे शिक्षण NEP 2020 नुसार एक कल्पनारम्य चित्रण
४ छत्रपती शिवाजी महाराज एक आदर्श राजा
५ कृत्रिम बुद्धिमत्ता (ARTIFICIAL INTELLIGENCE) आणि भविष्यातील संधी
६ महिला सबलीकरण एक सामाजिक आणि आर्थिक क्रांती

## रयत शिक्षण संस्था,सातारा

पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ग्रामीण भागातील मागासलेपणाचे कारण अविद्येत शोधले होते. शेतकरी, कष्टकरी, दिनदलितांच्या उद्धारासाठी दर्जेदार शिक्षणाची व्यवस्था व्हावी असे अण्णांनी मनोमन जाणले आणि काले, तालुका कराड, जिल्हा सातारा येथे ४ ऑक्टोबर १९१९ रोजी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली प्रशासकीय सोयीसाठी १९२४ मध्ये संस्थेचे मुख्यालय सातारा येथे स्थलांतरित करण्यात आले. दुर्गम भागातील वाड्या वस्त्या व गावातील विद्यार्थी डोळ्यासमोर ठेवून कर्मवीर अण्णांनी विद्यालयांची स्थापना केली. आज रयतेचे १ विद्यापीठ ४३ महाविद्यालये ४३९ हायस्कूल, ८ डी.एड् कॉलेजेस्, २६ प्राथमिक शाळा, १६ बालवाडया, ७१ वसतिगृह,८ आश्रम शाळा आणि ६ औद्योगिक प्रशिक्षण संस्था यामधून ४ लाखांपेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. १८००० संस्थानिष्ठ सेवकांच्या मदतीने रयत शिक्षण संस्था ज्ञानदानाच्या पवित्र क्षेत्रात कार्यरत आहे. महाराष्ट्रातील १४ व कर्नाटकातील १ अशा एकूण १५ जिल्ह्यांमध्ये संस्थेचे शैक्षणिक कार्य अविरतपणे सुरू आहे. केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारताच्या राष्ट्रीय शैक्षणिक नकाशावर रयत शिक्षण संस्थेने मानाचे स्थान मिळविले आहे.

## चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,श्रीरामपूर

जून १९६२ मध्ये हे महाविद्यालय सुरू झाले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागात स्वतंत्र वाणिज्य विद्या शाखा असलेले हे महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाला नॅक कडून करण्यात आलेल्या तृतीय मूल्यांकनात 'अ' मानांकन प्राप्त झाले असून सी.जी.पी.ए.३.१४ आहे. ११वी ते एम. कॉम. पीएच.डी. आणि बी.बी.ए.(सी.ए) पर्यंत दर्जेदार शिक्षणाची सुविधा येथे उपलब्ध आहे. येथील अनेक विद्यार्थी सी.ए.,सी.एस.,सी.डब्ल्यू.ए. झालेले असून बहुराष्ट्रीय कंपन्या, बँका, व्यापारी, आस्थापना, विमा व सेवा क्षेत्रात मोठ्या संख्येने निवडले जातात. कला, क्रीडा क्षेत्रात देखील हे महाविद्यालय सदैव आघाडीवर असते. महाराष्ट्रातील अनेक नामवंत कला, क्रीडा व वक्तृत्व स्पर्धांमध्ये विद्यार्थी चमकले आहेत .

कर्मवीर जयंती निमित्ताने वकृत्व स्पर्धा गेल्या ६२ वर्षापासून सुरू असून दरवर्षी या स्पर्धेला वाढता प्रतिसाद मिळतो आहे. या वक्तृत्व स्पर्धेच्या निमित्ताने महाविद्यालयीन युवकांना सामाजिक,आर्थिक व राजकीय परिस्थितीवर आपली मते मांडता येतात. कर्मवीर आण्णा व रयत माऊली कै.ती.सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक क्षेत्रातील विचार, कार्य, त्याग समर्पणाचे स्मरण केले जाते. वक्तृत्व स्पर्धेमधून व्यक्त झालेला वैचारिक धनाने विद्यार्थी विकसित होतात. व्यक्तिमत्व खुलविण्याला नवनवीन मार्ग सापडतात. जीवन समृद्धीकडे विद्यार्थ्यांची वाटचाल सुरू होते.

**वक्तृत्व स्पर्धेसाठी आपणास हार्दिक निमंत्रण !**